सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:- डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं. दिनांक: १६ मार्च, २०२२

## -:प्रसिध्दीपत्रक:-

**विषय:**- संचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, गट अ
**संदर्भ:**- जाहिरात क्रमांक ०३/२०२१, दिनांक २७ मे, २०२१

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत संचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, गट अ (जाहिरात क्रमांक ०३/२०२१) या पदासाठी दिनांक २७ मे, २०२१ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीस अनुसरुन विषयांकित पदासाठी ज्या उमेदवारांनी आयोगास अर्ज सादर केला आहे, अशा उमेदवारांनी त्यांच्या प्रोफाईलद्वारे केलेल्या अर्जातील विविध दाव्याच्या अनुषंगाने पात्रता तपासण्याकरीता खाली नमूद कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करणे आवश्यक आहे:-

| अ. क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा - जाहिरातीतील मुद्दा क्रमांक ३.३ मध्ये नमूद केलेली सर्व प्रमाणपत्रे | PDF | ५० | ५०० |
| ४ | अनुभवाचा पुरावा/प्रमाणपत्र जाहिरातीमधील मुद्दा क्रमांक ३.४ मध्ये नमूद केल्यानुसार | PDF | ५० | ५०० |
| ५ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ७ | अद्ययावत नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| ८ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ९ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १० | अनाथ आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ११ | खेळाडू आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १२ | अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| १३ | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १४ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १५ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |
| १६ | महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांकरीता वयोमर्यादेतील सवलतीचे पुरावे/प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |

**२.** उपरोक्त प्रमाणपत्रे/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील ‘उमेदवारांना सर्वसाधारण सूचन’ मधील प्रकरण क्रमांक चार मध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**३.** अद्ययावत नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिका-याने वितरित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे (वित्तीय वर्ष २०२१-२२) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**४.** लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र व अनुभवाचा पुरावा म्हणुन सादर करावयाचा नमुना आयोगाच्या संकेतस्थळावर ‘DOWNLOADS’ या सदरामधून उपलब्ध करुन घेण्यात यावा व त्यानुसार विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही नमुन्यात सादर केलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**५.** विषयांकित पदासाठी केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने (लागू असलेली) कागदपत्रे/प्रमाणपत्रे PDF करुन विहित आकारमानामध्ये आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ‘ONLINE FACILITIES’ अंतर्गत ‘Upload Documents’ या मेनूमध्ये दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी २३.५९ पर्यंत अपलोड करणे अनिवार्य राहील.

**६.** प्रमाणपत्रे विहित कालावधीत अपलोड न केल्यास अशा उमेदवारांचा निवड प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

ठिकाण:- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग